Research Papers

# नंतर आलेले लोक' मधील कवितांचे स्वरुप

**प्रा. प्रकाश कांबळे**
मराठी विभाग, के.एन. भिसे महाविद्यालय, कुर्डूवाडी.

**प्रस्तावना :**

अरुण काळे हे नव्वद नंतरच्या दशकातील एक महत्त्वपूर्ण कवी होत. मराठी साहित्याला वैश्विक अनुभूती मिळवून देणारे कवी म्हणून ते सर्वपरिचित आहेत. नव्वद नंतर जागतिकीकरणाच्या परिणामाने सर्वच क्षेत्रात सर्वच बाबतीत मोठी पडझड झालेली दिसून येते. सामान्यातला सामान्य माणूस जागतिकीकरणाने निर्माण केलेल्या संहारातून स्वतःला वाचवू शकला नाही. स्वातंत्र्योत्तर कालखंडात तळागाळापर्यंत झालेल्या शिक्षणाच्या प्रसाराने विशिष्ट वर्गापुरता मर्यादित असलेला विकास सर्वांगीण बनला. त्यातूनच नवशिक्षितांची पिढी आपल्या हक्क, स्वातंत्र्यासाठी लिहिती झाली. अरुण काळे हे याच संघर्षशील समुहाचे प्रतिनिधित्व करणारे कवी होत. त्यांचे रॉकगार्डन, सायरनचे शहर, नंतर आलेले लोक आणि ग्लोबलचं गावकूस आदि कवितासंग्रह प्रकाशित आहेत. प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून त्यांच्या 'नंतर आलेले लोक' या कवितासंग्रहातील कवितांचे स्वरुप उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

'नंतर आलेले लोक' या कवितासंग्रहाचा जागतिकीकरण आणि त्याच्या चांगल्या वाईट परिणामाने सामान्य माणसाचे आंतर्बाह्य बदलून गेलेले जीवन हा केंद्रीभूत घटक आहे. जागतिकीकरणाने सामान्य माणसाचे जगणे आणखी बिकट बनवले. इथल्या प्रस्थापित व्यवस्थेला सुसहाय्य, सहाय्यभूत ठरणारे जागतिकीकरण सामान्य माणसासाठी असहाय्य ठरु लागले. त्याचे खोलवरचे चित्रण अरुण काळे यांच्या 'नंतर आलेले लोक' मधून आपणास अनुभवता येते.

'नंतर आलेले लोक आधी गुराखी होते । चाचे आणि लुटारु होते, व्यापारी होते
टोळीवाले आक्रमक होते, ते मालक झाले । राजे आणि पुरोहित झाले
त्यांनी खंड शोधले, देश शोधले । ग्रह आणि तारे शोधले
आपल्याच बापांची नावं दिली त्यांना । माणूस शोधला नाही
नंतर आलेल्या लोकांनी..... (नंतर आलेले लोक, पृ. ०६)

जागतिकीकरणाने माणसा-माणसातील स्पर्धा तीव्र झाली. माणूस स्वतःच्या स्वार्थापलीकडे पाहणे विसरुन गेला. देष, धर्म, जात-पंथ यांच्या भींती जागतिकीकरणाने आणखी भक्कम केल्या. आपल्या वैयक्तिक फायद्यासाठी जो तो इतरांना फसवू लागला. परंतु नैसर्गिकतेची सारी मूल्ये मात्र हरवून गेली. रंगनाथ पठारे अरुण काळेंच्या 'नंतर आलेले लोक' चे वेगळेपण नोंदवताना लिहितात, ''जागतिकीकरणाची झिंग आणि माहितीतंत्रज्ञानाचा हंगामा व या साऱ्यात गरिबाची गरिबी किंवा शोषिताचं शोषण नष्ट होण्याऐवजी तो गरीब अन शोषितच नष्ट केला जातोय. ही जाणीव नंतर आलेले लोकच्या गाभ्याशी असलेली प्रधान जाणीव आहे.''[१] जागतिकीकरणाने सामान्य माणसाची खरी ओळखच पुसून टाकली. एवढंच काय पण त्याचं माणूसपण, त्याचे दलितपणच इथली व्यवस्था नष्ट करु पाहत आहे. अरुण काळेंची कविता सामान्य माणसाच्या असहाय्यतेला कारणीभूत असणाऱ्या जागतिकीकरणाच्या परिणामांवर गंभीर भाष्य करताना आढळून येते.

जागतिकीकरणामुळे सामाजिक जीवनव्यवस्थेचे स्वरुप बदलून गेल्याचे आढळून येते. सामान्य माणसाच्या जीवनाला वेढून असलेली भयावहता, क्रूरता रेखाटणारी अरुण काळे यांची कविता, त्यांचे प्रत्येक क्षेत्रात होत चाललेले अवमूल्यनही परिणामकारकतेने प्रतिबिंबित करते.

'हवा-पाणी राहिले नाही सर्वांचे । रस्ते वाटा राहिल्या नाहीत सर्वांच्या
जगाचं ग्लोबल गाव केलंय ना । तर प्रेमाचं होऊ द्या ना बावा जागतिकीकरण
(नंतर आलेले लोक, पृ. ४१)

'नंतर आलेले लोक' मधून जागतिकीकरणाने घडवून आणलेल्या मानवी जीवनाच्या असहाय्य, विदारक पडझडीचे चित्र आपणासमोर येते. तंत्रज्ञानाच्या शोधाने माणसे शरीराने जवळ आली परंतु मनाने दूर गेली. अरुण काळेंच्या 'नंतर आलेले लोक' मधून तंत्रज्ञानाने कुरुप, असहाय्य, निराधार बनलेली माणसे पानोपानी भेटत राहतात. अरुण काळे यांच्या कवितेतील जागतिकीकरण यावर नेमकेपणाने भाष्य करताना भा.ल.भोळे लिहितात, ''अरुण काळे यांची कविता जागतिकीकरणाच्या बाजार संस्कृतीवर बोलते, माहितीक्रांतीचे अंतरंगही उलगडून दाखवते आणि त्या क्रांतीच्या अग्रक्रमात ज्यांचे अगतिकीकरण झाले आहे त्यांच्या प्रश्नांनाही वाचा फोडते.''[२] पुरातन काळापासून दीन, दलितांची जी फरफट सुरु होती ती जागतिकीकरणाच्या प्रभावाने आणखी वाढली. बेकारी, भूकेकंगाल माणसे, महागाई, धर्मांधर्मातील लढाई, दंगली, दहशतवाद, गलिच्छ राजकारण, शोषण या व अशा विभिन्न क्षेत्रातील वास्तव जीवनावर प्रकाश टाकण्याचे काम 'नंतर आलेले लोक' मधील अरुण काळेंच्या कवितेने केले आहे.

अरुण काळे यांची 'नंतर आलेले लोक' मधील कविता सामाजिक जाणिवांचे तीव्र भान जोपासताना दिसते. अरुण काळे हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे अनुयायी असल्याने त्यांचा पिंड सामाजिक जाणिवांना जोपासणारा आहे. भोवतालच्या सामाजिक जीवनात सर्वसामान्य माणसाचे विभिन्न मार्गांनी शोषण होत राहते. या शोषणाला प्रतिकार करण्याचे प्रचंड सामर्थ्य अरुण काळेंच्या कवितेत आहे. सामाजिक जाणीव आणि अरुण काळे यांची कविता एकाच नाण्याच्या दोन बाजू असाव्यात तशा दिसून येतात.

'मी नाहीए कुणी समालोचक । हरणाऱ्या टीमच्या बाजूने बोलणारा
मी लांब पल्ल्याचं । विजयी सूत्र मांडणारा
मी नात्यांची नव्याने मांडामांड करतो
माणूस भंगारात येऊ नये म्हणतो । कवितेतून पुन्हा पुन्हा उगवत राहतो'
(नंतर आलेले लोक, पृ. ३३)

सामाजिक जीवनातील वंचितांच्या रंजल्या-गांजलेल्यांच्या, दुःखांविषयी अंतःकरणातून आस्था असणारी कविता अरुण काळेंच्या 'नंतर आलेले लोक' मधून पाहवयास मिळते. जागतिकीकरणाने उध्दवस्त केलेल्या नातेसंबंधाची पुन्हा नव्याने मांडामांड करण्याचा ध्यास अरुण काळेंच्या कवितेला असलेला दिसून येतो. माणसांचे आज दिवसेंदिवस अवमूल्यन होताना पाहवयास मिळते. अरुण काळे माणसाचे कवडीमोल विकले जाणे कवितेच्या माध्यमातून प्रतिबिंबित करताना दिसतात. माणसाचे माणूसपण चिरंतन टिकून राहण्यासाठीची प्रार्थना त्यांची कविता करते.

'खरी नाती धूसर झाल्यावर । नात्यांची राहील का दांभिकता?
किमान होईल का आस्थेवाईक चौकशी । गवंडी, सुतार किंवा वॉल पेंटरची?
जसं विचारलं जातं नाव-गाव । वेश्येला एकांतात.....।'
(नंतर आलेले लोक, पृ. ३१)

जागतिकीकरणाने मानवी नातेसंबंध धूसर होऊ लागल्याचे दिसून येते. पूर्वी नात्यांना टिकवून धरणारा माणूस आज नाती उधळू लागलेला दिसून येतो. आपल्या स्वार्थासाठी इतरांना दुखवणाऱ्यांची संख्या आज समाजात दिवसेंदिवस वाढत असलेली दिसून येते. एकत्र कुटुंबपध्दती ते विभक्त कुटुंबपध्दतीकडे सामान्य माणसांचा सुरू असलेला ओढा हा सामाजिक व्यवस्थेच्या निकोप वाढीसाठी मोठा अडथळा ठरु पाहतोय. सामाजिक जीवनात निर्माण झालेली विभिन्न वर्गपरंपरेमुळे माणसा-माणसांत द्वेष मोठ्या प्रमाणात वाढू लागल्याचे निरीक्षण अरुण काळेंची कविता नोंदवताना दिसते. अरुण काळे यांच्या कवितेतून व्यक्त होणाऱ्या सामाजिक जाणिवेविषयी भाष्य करताना मनोहर जाधव लिहितात, ''अरुणच्या

व्यक्तिमत्वाचं आणि त्याच्या कवितेचं वैशिष्ट्य म्हणजे तो अगदी खुल्या दिलानं समाजवास्तव समजावून देई. आपले पूर्वग्रह आपल्याच आकलनामध्ये अडथळा आणू शकतात असे त्याला वाटे. म्हणूनच बदलत्या ग्लोबल व्हिलेजच्या काळात दलित शोषित जीवनाची आणि जातीव्यवस्थेची परिमाण कशी बदलताहेत, हे तो आपल्या कवितेतून अधोरेखित करत असे.''[३] सामाजिक वास्तवाचे डोळस भान जोपासतानाच जातीव्यवस्थेची उतरंड, व्यापारातील, सामाजिक व्यवहारातील बदलत जाणारे संकेत, विशिष्ट वर्गाकडून विशिष्ट वर्गाला मिळणारी अन्यायी, विशिष्ट वागणूकीला अधोरेखित करण्याचे काम अरुण काळेंची कविता अत्यंत प्रामाणिकपणे करते.

एकूणच अरुण काळे यांच्या 'नंतर आलेले लोक' मधील कवितांचे स्वरूप जाणून घेताना वैश्विक प्रश्नांना सामोरी जाणारी त्यांची कविता आदर्श कविता म्हणून आपणासमोर येते. (१) 'नंतर आलेले लोक' हा अरुण काळे यांचा जागतिकीकरणाच्या परिणामावर गंभीर भाष्य करणारा महत्त्वाचा कवितासंग्रह आहे. (२) 'नंतर आलेले लोक' मध्ये प्रस्थापित सामाजिक व्यवस्था आणि सामान्य दलित व्यवस्था यांच्या दरम्यानचा शोषित-शोषक असा पुरातन संघर्ष तिच्या नव्या परिमाणांसह अधोरेखित केला गेला आहे. (३) दलितांच्या उध्दाराची मूलप्रेरणा असणाऱ्या डॉ.आंबेडकर आणि त्यांनी उभारलेल्या चळवळीविषयी अरुण काळेंची कविता फार आस्थेने बोलताना दिसून येते. (४) अगतिक, सामान्य माणसांच्या दुभंगलेपणाचे आणि शोषणाचे मन हेलावून टाकणारे चित्रण आपणाला अरुण काळेंच्या 'नंतर आलेले लोक' मधून अनुभवयास येते. (५) तीव्र सामाजिक भानाची कविता म्हणून अरुण काळे यांच्या 'नंतर आलेले लोक' मधील कवितेकडे पाहता येते.

**संदर्भ :**

(१) रंगनाथ पठारे, इतिहासाचा विषाणू दाखविणारी कविता : नंतर आलेले लोक, संवादिनी, महाराष्ट्र फौंडेशन पुरस्कारातील भाषण

(२) भा.ल.भोळे, नंतर आलेले लोक : समकालीनतेचे आव्हान यथार्थपणे समजून घेणारी कविता, युगवाणी, जाने ते मार्च २००७ पृ. १३

(३) मनोहर जाधव, अरुण काळे : मोठा कवी आणि उमदा माणूस, इत्यादी, एप्रिल, २००८, पृ. १७